


**महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान**
**सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

करिअर कट्टा
**सेंटर ऑफ एक्सलन्स नामांकन प्राप्त**

डॉ. आंबेडकर महाविद्यालय
दीक्षाभूमी, नागपूर
**बारामती राज्यस्तरीय अधिवेशन अहवाल**
**१२ व १३ जानेवारी २०२५**

दिनांक १० जानेवारी २०२४ रोजी करिअर संसदेची बैठक महाविद्यालायच्या मा. प्राचार्या यांच्यासोबत झाली. यावेळी मा. प्राचार्या, करिअरकट्टा समन्वयक आणि पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर च्या प्राचार्या मा. **डॉ. भूवनेश्वरी मेहरे** मॅडम यांनी सुरवातीपासूनच करिअर कट्टा साठी प्रोत्साहित केले. अधिवेशनासाठी तर त्यांनी मोकळेपणाने सहकार्य केले. या अधिवेशनासाठी प्राचार्या डॉ. भूवनेश्वरी मेहरे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिति, महाविद्यालयातील समस्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी अधिवेशनासाठी शुभेच्छा दिल्या.

**विषय: बारामती राज्यस्तरीय अधिवेशन.**




महाराष्ट्र उच्च शिक्षण व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा उपक्रमाअंतर्गत करिअर संसदेचे अधिवेशन दि.१२ व १३ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (MITSC) आणि शारदाबाई पवार महिला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शारदानगर, ता. बारामती, जि. पुणे येथील अप्पासाहेब पवार ऑडिटोरियम, शारदानगर, बारामती  यशस्वीरीत्या संपन्न झाले. या कार्यक्रमात डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे करिअर कट्टा समन्वयक डॉ. विद्या चौरपगार, डॉ. विठ्ठल बोंदर तसेच नऊ करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. या दोन दिवसीय अधिवेशनात  अनेक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव व विविध क्षेत्रांची माहिती मिळावी यासाठी नियोजित भेटींचे आयोजन करण्यात आले होते.

प्रसिद्ध वक्त्यांनी आपले अनुभव आणि विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले, ज्यामुळे उद्योग व नौकरीच्या वेगवेगळ्या संधींबाबत विद्यार्थ्यांना माहिती मिळाली. प्रशासकीय, उद्योग व्यवसाय, शेती क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख यानिमित्याने विधार्थ्यांना झाली.प्रत्येक सत्रातील मान्यवर वक्त्यांसोबत विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने संवाद साधला. त्यामुळे अधिवेशन अत्यंत प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. यशवंत शितोळे आणि त्यांचे समस्त पदाधिकारी तसेच शारदाबाई पवार महाविद्यालयाच्या सदस्यांच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाचे विशेष कौतुक केले गेले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आणि शैक्षणिक प्रगतीस चालना देणारा ठरला आणि एक उत्कृष्ट शिक्षण प्रक्रिया अनुभवण्याची संधी मिळाली.

या अधिवेशनासाठी डॉ. आंबेडकर कॉलेज चे एकुण ९ पदाधिकारी व दोन समन्वयक, डॉ. विद्या चौरपगार व प्रा, विठ्ठल बोंदर यांनी सहभाग घेतला होता.

प्राचार्य प्रवर्तक डॉ. शरयू तायवाडे मॅडम, प्राचार्य प्रवर्तक डॉ सुजीत मेत्रे याच्या मार्गदर्शनात नेतृत्वात, संपूर्ण नागपूर विभागातील  करिअर संसदेच्या अधिवेशनासाठी सहकार्य मिळाले. जिल्हा समन्वयक नागपुर विभाग समन्वयक डॉ. श्रीराम फरताडे,  विभागीय समन्वयक डॉ. नरेंद्र रघताटे, नागपूर ग्रामीण समन्वयक डॉ वर्षा वैद्य  मॅडम, डॉ. एस. डी. देशभ्रतार यांनी प्रवासाचे उत्तम नियोजन करून अधिवेशन यशस्वी करण्यास सहकार्य केले. त्याकरिता सर्व मान्यवरांचे मनापासून धन्यवाद.

मा.यशवंत शितोळे, अध्यक्ष महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना, मार्गदर्शन आणि त्यांनी केलेले उत्तम नियोजन यासाठी आम्ही अत्यंत ऋणी आहोत. किरण पाटील मॅडम यांनी सततचे केलेले प्रेमळ सहकार्य विसरता येणार नाही.







शारदाबाई पवार आर्ट्स कॉमर्स आणि विज्ञान महाविद्यालय, बारामती







बारामती राज्यस्तरीय अधिवेशनात प्रश्नोत्तरी स्पर्धेत डॉ. आंबेडकर कॉलेज च्या पदाधिकारी लिनटा टॉमसन आणि धनश्री चोपडे यांनी बक्षीस मिळवले.







<u>बारामती राज्यस्तरीय अधिवेशन</u>

(फिल्ड विजिट)






- १. डॉ. विद्या चौरपगार, राज्यशास्त्र विभाग
- २. प्रा. विठ्ठल बोंदर. संगणकशास्त्र विभाग
- करिअर कट्टा Instagram लिंक
- https://www.instagram.com/p/C-७c५lXSGSS/?igsh=cXo२djd१emszMXI४
-